

# मुंडेंच्या राजीनाम्यासाठी भाजपचा दबाव


दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष ३रे

www.metrocityvrutant.in  गुरुवार दिनांक 09/01/२०२५  METRO CITY VRUTANT

» पिंपरी चिंचवड व पुणे » पान 8 » अंक 19 » RNI - MAHMAR/2021/51259 » metrocity924@gmail.com » किंमत २ रु




संपादकीय

# शहरात प्रचंड वाहतूक कोंडी व प्रदूषण !



## वाहतूक कोंडी सुरळीत करणे आवश्यक: नागरिकांच्या अपेक्षा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पिंपरी चिंचवड शहरात प्रदूषण हे मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शहरातील वाढत्या वाहतुकीमुळे प्रदूषणात वाढ होत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील लोकसंख्या 35 लाखांपर्यंत वाढली आहे. जस-जशी लोकसंख्या वाढत आहे, तस तशी वाहनांची संख्या ही वाढत आहे. परंतु पिंपरी-चिंचवड शहरात प्रशासनाच्या वतीने सुरळीत वाहतुकीचे नियोजन शून्य असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी वाढत आहे. शहरात प्रामुख्याने तापकीर चौक, भूमकर चौक, चिंचवड स्टेशन, रावेत, पिंपरी बाजार, चाफेकर चौक या प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात मिळत आहे.

प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने वाहतूक कोंडीवर नियंत्रण राहिलेले नाही त्यामुळे वातावरणात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, या वाढलेल्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला असून, शहरातील नागरिकांमध्ये श्वसनाचे आजार वाढत आहे. हवेमुळे प्रदूषणाचे कण नाकात-तोंडात जात असल्याने नागरिकांना यासंदर्भातील आजाराला तोंड द्यावे लागत आहे.

यामुळे वेगवेगळे आजार होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामध्ये दवाखान्यात गेल्यानंतर विविध खर्च होत असतो. यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे.

प्रथम वाहतूक कोंडी सोडविणे आवश्यक आहे. सुरळीत वाहतूक होत असतानाच कालबाह्य झालेल्या वाहनांची चौकशी होणे आवश्यक आहे. प्रत्येक वाहनांची पीयूसी तपासणी होणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड शहरात ज्याप्रमाणे हेल्मेट सक्ती करण्यात येत आहे, त्याचप्रमाणे कालबाह्य वाहने वाहतुकीतून वगळणे ही आवश्यक आहे तसेच वातावरणात प्रदूषण वाढू नये, यासाठीही योग्य प्रकारे नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही तसेच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी योग्य उपाययोजना केल्याने वाहतुक सुरळीत होईल, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. परंतु, तसे होत नाही, यासाठी एक उदाहरण द्यावे लागते तापकीर चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असताना बीआरटी मार्गातूनही खाजगी वाहने सर्रासपणे सुरु असतात. बी आर टी रस्त्या मधून खाजगी वाहनांना बंदी असतानाही तापकीर चौकात अशी वाहने बीआरटी मार्गाने चालविणारे वाहक मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

त्यामुळे अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशा अपघाताच्या घटनांना ही आळा बसणे आवश्यक आहे. वाहतूक प्रशासनाने वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या नागरिकांवर योग्य ते कारवाई करावी, ती केली जाते.

परंतु वाढणारे प्रदूषण व वाढणारी वाहतूक कोंडी यावरही नियंत्रण आणणे आवश्यक आहे.

## 'एचएमपीव्ही'चा संभाव्य प्रादुर्भाव रुग्णांबाबत सतर्कता!




पिंपरी-चिंचवड : राज्यात ह्युमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) या साथरोगाचा धोका वाढू लागला आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिका सतर्क झाली आहे. शहरातील सर्दी खोकल्याच्या रुग्णांचे आता 'सर्वेक्षण' करण्यात येणार आहे. याबाबत महापालिका प्रशासन अधिकारी तथा आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे.

ह्युमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) च्या संभाव्य धोक्याबाबत सतर्कता आणि खबरदारीच्या निमित्ताने भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका भवन येथे आयुक्त शेखर सिंह आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपायुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मकरंद निकम, पर्यावरण विभागाचे संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता बाबासाहेब गलबले आदी उपस्थित होते.

## अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी प्रभावी अंमलबजावणी - मंत्री दत्तात्रय भरणे



मुंबई :अल्पसंख्याक समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास करण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करावी, नाविन्यपूर्ण योजनांच्या माध्यमातून लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या सूचना अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या. अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निधी कमी पडू देणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. मंत्री भरणे यांनी आज मंत्रालयात अल्पसंख्याक विकास विभागाचा आढावा घेतला. यावेळी सचिव रुचेश जयवंशी, सहसचिव मोईन ताशिलदार, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री भरणे म्हणाले की, अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहीत आणण्यासाठी प्रयत्न करणार असून त्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी शासन कटिबद्ध आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचा निधी वाढविण्यासाठी पाठपुरावा करणे, स्वयंसहायता बचतगट योजना महत्वपूर्ण आहेत. या विभागाच्या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, अशी सूचनाही त्यांनी केली.

## युवकांनो ड्रग्स फ्री समाज घडवा -मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



ठाणे : देशाचे आणि समाजाचे नुकसान करीत असलेल्या न दिसणाऱ्या शत्रूशी लढण्यासाठी समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. ड्रग्स व तत्सम अंमली पदार्थांच्या माध्यमातून काही लोक समाज पोखरण्याचे दुष्कर्म करीत आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी सजग राहा, सैनिक म्हणून पुढे या, हीदेखील एक प्रकारची देशभक्ती आणि समाजाची सेवा आहे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आज नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित "नशामुक्त नवी मुंबई" अभियानाचे नवी मुंबई, वाशी येथील सिडको ऑडिटोरियम येथे उद्घाटन संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, प्रख्यात अभिनेता आणि "नशामुक्त नवी मुंबई" या उपक्रमाचे आयकॉन जॉन अब्राहम, आमदार मंदा म्हात्रे, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, विधानपरिषद सदस्य विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, संजय येनपुरे, पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, प्रशांत मोहिते, रश्मी नांदेडकर, संजयकुमार पाटील, महाविद्यालयीन विद्यार्थी, नशामुक्तीचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आदी उपस्थित होते.

"Art of silence" या मूकनाट्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तर या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या हस्ते "नशामुक्त नवी मुंबई" अभियानाच्या चित्रफितीच्या प्रकाशनाने संपन्न झाले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, ड्रग्समुळे स्वतःच्या आयुष्यासोबत आपण देशाचेही नुकसान करतो हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. प्रवाहासोबत जाणारे अनेक असतात, परंतू चांगले करण्यासाठी प्रवाहाविरुद्ध जावे लागते, त्यासाठी शारीरिक ताकदीपेक्षा मानसिक ताकद गरजेची आहे.

"नशामुक्त नवी मुंबई" हे अभियान अतिशय महत्वाचे आहे. गृह खात्याच्या पहिल्याच बैठकीत पोलिसांना सांगितले की, आपल्याला ड्रग्स विरुद्ध मोठी लढाई लढायची आहे. सरळ लढाई करता येत नाही म्हणून अंमली पदार्थांच्या देश पोखरण्याचा प्रयत्न केला जातोय.

# ११ जानेवारीला बाजीराव सातपुते यांचा अभीष्टचिंतन सोहळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीच्या वतीने श्रमश्री बाजीराव सातपुते यांच्या सेवानिवृत्ती आणि एकसष्ठीनिमित्त अभीष्टचिंतनसोहळ्याचे आयोजन संकल्प गार्डन कार्यालय, आळंदी रोड, वडमुखवाडी, चऱ्होली येथे शनिवार, दिनांक 11 जानेवारी 2025 रोजी करण्यात आले आहे.

संध्याकाळी ठीक 04:00 वाजता आमदार महेश लांडगे यांच्या अध्यक्षतेखालील संपन्न होणाऱ्या या सोहळ्याचे उद्घाटन 89 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस आणि ज्येष्ठ समाजसुधारक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते करण्यात येणार असून, टाटा मोटर्स लिमिटेडचे निवृत्त महाव्यवस्थापक मनोहर पारळकर, नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे आणि एस. के. एफ. एम्प्लॉईज युनियन अध्यक्ष सुनील आव्हाळे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. 'एक झाड आईसाठी | एक झाड राष्ट्रासाठी ||' या उपक्रमांतर्गत आई - वडिलांच्या हस्ते सकाळी दहा वाजता वृक्षारोपण करण्यात येईल. दुपारी 12:00 वाजता तळवडे येथील इंद्रायणी वृद्धाश्रमातील माता - पित्यांसाठी स्नेहभोजन होईल.

दुपारी ठीक 4:00 वाजता अभीष्टचिंतन सोहळ्यात बाजीराव सातपुते यांचा मान्यवरांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरव करण्यात येईल. तसेच मधुमेहमुक्त भारत अभियानाचे पाईक डॉ. राजेंद्र माने, सेंद्रिय खते व वनस्पतीजन्य औषध निर्मितीसाठी संशोधन करून डॉक्टरेट प्राप्त करणारे डॉ. संभाजी सातपुते आणि अभिजात पाली भाषेचे प्रसारक अन् प्रचारक महेंद्र भारती यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे कार्याध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी दिली आहे.

# बजाज ब्रोकिंग आणि तामिळनाड मर्कंटाइल बँकची भागीदारी

BAJAJ FINSERV

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे – बजाज फायनान्स लिमिटेडची ब्रोकिंग शाखा, बजाज ब्रोकिंगने आज तामिळनाड मर्कंटाइल बँकेसोबत (टीएमबी) एक धोरणात्मक भागीदारी जाहीर केली, ज्यामध्ये बँकिंग, ब्रोकिंग आणि गुंतवणूक सेवा एकत्र करणारे सर्वसमावेशक 3-इन-1 खाते समाधान दिले जाईल.या भागीदारीमुळे तामिळनाड मर्कंटाइल बँकेच्या ग्राहकांना बजाज ब्रोकिंगसोबत ऑनलाइन ट्रेडिंग करता येईल आणि त्यांच्या विस्तृत उत्पादन व सेवांच्या श्रेणीचा लाभ घेता येईल. या क्रॉस-फंक्शनल प्लॅटफॉर्ममुळे निधी हस्तांतरण सुलभ होईल, कागदपत्रे कमी होतील आणि विविध उत्पादनांमध्ये गुंतवणुकीसाठी एक अनोखा तंत्रज्ञान-आधारित इंटरफेस मिळेल.

भागीदारीबद्दल भाष्य करताना, बजाज ब्रोकिंगचे व्यवस्थापकीय संचालक मनीष जैन म्हणाले, "आम्ही तामिळनाड मर्कंटाइल बँकेच्या ग्राहकांसाठी आमच्या सर्वसमावेशक गुंतवणूक उपायांचा विस्तार करताना आनंदित आहोत. आमचा प्रगत ट्रेडिंग प्लॅटफॉर्म विविध एक्सचेंजेसवर पारदर्शकता आणि सोपेपणा आणण्याचे उद्दिष्ट ठेवतो. आम्ही आमच्या तंत्रज्ञान-आधारित सेवांचा आणि संशोधनाच्या अंतर्दृष्टीचा फायदा अधिक गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचवू इच्छितो. ही भागीदारी गुंतवणूकदारांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी साधने उपलब्ध करून देईल आणि आमची अखिल भारतीय उपस्थिती वाढवेल."तामिळनाड मर्कंटाइल बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ सली एस. नायर म्हणाले, "आम्हाला देशातील सर्वात प्रतिष्ठित व्यवसाय समूहांपैकी एक असलेल्या कंपनीच्या नेतृत्वाखालील भारतातील अग्रगण्य ब्रोकिंग हाऊसेसपैकी एकासोबत भागीदारी करताना आनंद होत आहे.

# "गड किल्ले यांचा इतिहास आजही प्रेरणादायी!" - डॉ.माधवराव सानप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी "गड किल्ले यांचा इतिहास आजही प्रेरणादायी आहे!" असे विचार निवृत्त पोलीस महानिरीक्षक डॉ. माधवराव सानप यांनी रविवार, दिनांक 05 जानेवारी 2025 रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्यनगरी, जयगणेश बँक्वेट हॉल, नवीन देहू - आळंदी रस्ता, मोशी येथे व्यक्त केले. इंद्रायणी साहित्य परिषद आयोजित एकदिवसीय इंद्रायणी साहित्य संमेलनात ज्येष्ठ लेखक अरुण बोऱ्हाडे लिखित 'दुर्ग भटकंती : जिंजी, वेल्लोर, तंजावर' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. माधवराव सानप बोलत होते. ज्येष्ठ उद्योजक रामदास काकडे, लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ, महाराष्ट्र साहित्य परिषद - पिंपरी चिंचवड शाखाध्यक्ष राजन लाखे, पिंपरी - चिंचवड महापालिका विज्ञान केंद्र संचालक प्रवीण तुपे, संमेलनाध्यक्ष दादाभाऊ गावडे, स्वागताध्यक्ष वंदना आल्हाट, परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. माधवराव सानप पुढे म्हणाले की, "इतिहास हा केवळ पुस्तकातून वाचण्यापेक्षा ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्याने अधिकच उमजत जातो. अरुण बोऱ्हाडे यांनी केलेल्या भटकंतीतून अवगत झालेला इतिहास लालित्यपूर्ण शैलीतून पुस्तकात मांडला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे!"

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते बोऱ्हाडे यांचा सन्मान करण्यात आला. आपल्या मनोगतातून अरुण बोऱ्हाडे यांनी, "छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजय मोहिमेत जिंकलेल्या किल्ल्यांचा इतिहास रोमहर्षक आहे. जिंजीचा किल्ला म्हणजे सात किल्ल्यांचा दुर्गसमूह आहे. स्वराज्याची तिसरी राजधानी असलेल्या या किल्ल्याला प्रत्येक मराठी माणसाने आवर्जून भेट द्यायला हवी. तितकेच महत्त्व वेल्लोरच्या किल्ल्याचे आहे. भारतातील सर्वाधिक बळकट आणि सुंदर भुईकोट किल्ला असून तो जिंकण्यासाठी मराठ्यांनी चौदा महिने वेढा घातला होता. पुढील तीस वर्षे तो मराठ्यांच्या ताब्यात होता. मराठ्यांच्या कर्तबगारीची साक्ष देणारी दक्षिणेतील तंजावर ही व्यंकोजीची राजधानी, तेथील बृहदेश्र्वर मंदिर हे खरे वैभव आहे. कला, साहित्य, सौंदर्य आणि शौर्याची प्रतीके म्हणून या स्थळांची माहिती देणारे 'दुर्ग भटकंती : जिंजी, वेल्लोर, तंजावर' हे पुस्तक इतिहासप्रेमी आणि गडकोट प्रेमी वाचकांना उपयुक्त ठरेल!" असे प्रतिपादन केले. इंद्रायणी साहित्य परिषदेचे पदाधिकारी आणि मोशी ग्रामस्थ यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रदीप गांधलीकर यांनी सूत्रसंचालन केले. संदीप तापकीर यांनी आभार मानले.

# शरद मोहोळ टोळीचा विकी चव्हाण ला बेड्या



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

हिंजवडी पोलिसांनी शरद मोहोळ टोळीचा सदस्य असलेल्या विकी दीपक चव्हाण ला पिस्तुलासह बेड्या ठोकल्या आहेत. हिंजवडी पोलिसांनी मेझा नाईन हॉटेल जवळ ही कारवाई केली आहे. विकी चव्हाण कडे दोन पिस्तूले आणि चार जिवंत काडतुसे पोलिसांना मिळाली आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेल मेझा नाईन जवळ काळ्या रंगाचा शर्ट घातलेला व्यक्ती हा कमरेला पिस्तूल लावून दुचाकी वर फिरत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ पांचाळ यांच्या टीमला मिळाली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी केंगले, गिलबिले, पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. खात्री करून आरोपी विकी दीपक चव्हाण ला ताब्यात घेतलं. पंचासमक्ष गुन्हेगार विकीची अंगझडती घेण्यात आली.

# मुंडेंच्या राजीनाम्यासाठी भाजपचा दबाव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वादात सापडलेले अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभय दिले आहे. मात्र भाजप नेत्यांची कृती लक्षात घेता पक्ष मुंडे यांच्याबाबत फार काही अनुकूल नसल्याचे नसून राजीनाम्यासाठी दबाव वाढत आहे.महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. भाजपचे आमदार सुरेश धसदेखील मुंडे यांच्या हकालपट्टीची सातत्याने मागणी करीत आहेत. ते रोज नवे आरोप करत असताना भाजपने त्यांना आवरलेले दिसत नाही. अभिनेत्री प्राजक्ता माळीला वादात ओढल्यावरुन पक्षाने त्यांची कानउघाडणी केली व त्यांनीही दिलगिरी व्यक्त करुन विषय संपविला. मात्र धनंजय मुंडे यांच्यावर वेगवेगळे गंभीर आरोप करीत असताना भाजपकडून धस यांना मोकळीक कशी दिली जाते, असा सवाल केला जात आहे.



# विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत प्रशिक्षण सुद्धा महत्वाचे- मंत्री चंद्रकांत पाटील

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : शिक्षण विद्यार्थ्यांना ज्ञान आणि सैद्धांतिक माहिती प्रदान करते तर प्रशिक्षण त्यांच्या कौशल्यांची आणि प्रत्यक्ष अनुभवाची जोपासना करते. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात यशस्वी होण्यासाठी शिक्षणासोबतच प्रशिक्षणही अत्यंत महत्त्वाचे असल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.मुंबईत आज उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांची छात्र संसदेच्या विद्यार्थ्यांनी भेट घेतली. विविध राज्यातील विद्यार्थी महाराष्ट्र आणि गोवा दौऱ्यावर आहेत. या विद्यार्थ्यांची मंत्री पाटील यांनी विचारपूस केली.मंत्री पाटील म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 21 व्या शतकातल्या युवकांचे विचार, आशा आणि आकांक्षा लक्षात घेऊन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. यामध्ये आंतरशाखीय विषयांच्या अभ्यासावर भर, शिक्षणाची उपलब्धता आणि शिक्षणामध्ये प्रवेश, मातृभाषेमध्ये शिक्षण,जागतिक एकात्मतेवर भर यावर अधिक लक्ष केंद्रित करुन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे.त्याची महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.त्यामुळे शिक्षण आणि प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळणार आहे. प्रशिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक ज्ञानाची व्यावहारिक उपयुक्तता शिकवते, जे पुढे जाऊन त्यांना नोकरी मिळवण्यासाठी उपयुक्त ठरते, असे सांगून मार्चमध्ये होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला विद्यार्थ्यांनी आवर्जून उपस्थित राहावे असेही सांगितले.

# विविध कामांना मंजुरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : 1 नोव्हेंबर 2005 पुर्वी पदभरती जाहिरात किंवा अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजना (पेन्शन) लागू करण्यासह विविध विषयांस प्रशासक शेखर सिंह यांनी यांनी आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत मान्यता दिली. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असणारे विविध विषय प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीत ठेवण्यात आले होते. यावेळी विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह संबंधित विभागांचे विभाग प्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

# संग्रहालयांच्या माध्यमातून सांस्कृतिक श्रीमंतीचे दर्शन – मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : एखाद्या शहराची श्रीमंती ही तिथे राहणाऱ्या श्रीमंत लोकांवरुन नाही, मोठ्या इमारती वरुन नाही तर तेथील संग्रहालयांच्या माध्यमातून दिसून येते. जगातील सर्व चांगल्या शहरांमध्ये उत्तम अशी संग्रहालये आहेत. असेच एक उत्तम संग्रहालय आपण खुले करत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. बृहन्मुंबई महापालिकेच्या वतीने नूतनीकरण करण्यात आलेल्या डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालयाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.संग्रहालयाच्या माध्यमातून त्या देशाची, शहराचीसंस्कृती, लोक जीवन आणि इतिहास कळतो, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपला ऐतिहासिक वारसा भावी पिढीला पाहता यावा हा संग्रहालय उभारणीचा उद्देश आहे. आतापर्यंत झालेला विकास आणि त्यासाठी झालेली स्थित्यंतरे भावी पिढीला समजणे आवश्यक आहे. भारत हा जगातील सर्वात जुनी संस्कृती आजही नांदत असलेला एकमेव देश आहे. आपला देश संस्कृतीची खाण आहे. ती आपण जपली पाहिजे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डॉ. भाऊ दाजी लाड हे डॉक्टर होते. पण त्यांनी आपले सर्व जीवन समाजासाठी समर्पित केले. ऐतिहासिक ठेवा जपण्यासाठी मोलाचे कार्य केले. त्यांनी या संग्रहालयातील अनेक वस्तू दिल्या आणि गोळाही केल्या. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून या संग्रहालयास 50 वर्षापूर्वी डॉ. भाऊ दाजी लाड यांचे नाव देण्यात आले. आज 50 वर्षानंतर त्यांच्या नावाचे हेच संग्रहालय नव्या रुपात जनतेसाठी खुले करताना मोठा आनंद होत आहे.

पर्यटकांसाठी हे संग्रहालय एक आकर्षण असेल. यातील वस्तू, दुर्मिळ छायाचित्रे या माध्यमातून लोकांना एक वेगळा अनुभव मिळेल. या संग्रहालयाच्या नूतनीकरणासाठी हातभार लावलेल्या सर्वांचे अभिनंदन करतो असेही फडणवीस म्हणाले.

# 'जागतिक स्पर्धेसाठी जग खुलं आहे, संधीचे सोने करा'– राज्यपाल

मुंबई : सध्याच्या युगात प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी सर्वसामान्यांना शिक्षण आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी संशोधनपर अभ्यासक्रमावर भर द्यावा. कारण आता जग तुमच्यासाठी खुले आहे. त्यामुळे वेळ वाया न घालविता संधीचे सोने करा असा कानमंत्र राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना दिला. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. केतकी पाटील सभागृहात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील, संचालिका केतकी पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पो.अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी भिमराव दराडे, जळगाव उपविभागीय अधिकारी विनय गोसावी, सचिव डॉ. वर्षा पाटील, डॉ. सुहास बोरले, ह्दयरोग तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, डॉ. अनिकेत पाटील, डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ एन. एस. आर्विकर, डॉ. माया आर्विकर, डीन डॉ. प्रशांत सोळंके, गोदावरी आयएमआरचे संचालक डॉ. प्रशांत वारके उपस्थित होते. राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांनी वैद्यकीय महाविद्यालयासह अनेक शैक्षणिक संस्था उभारुन भविष्यातील नेतृत्व घडविण्याचे कार्य केले आहे. देश आणि राज्यातील सरकारने आता दुर्गम भागातही शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच नवीन शैक्षणिक धोरण देखील आता अंमलात येत असल्याने विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने करावे, असा कानमंत्रही राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.



# नववर्षाच्या सुरुवातीलाच वरुण ने मुंबईत घेतला आलिशान फ्लॅट!

बॉलिवूड अभिनेता वरुण धवन त्याच्या 'बेबी जॉन' या सिनेमामुळे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. 2024च्या 25 डिसेंबरला वरुण धवनने 'बेबी जॉन' प्रदर्शित करत चाहत्यांना खास गिफ्ट दिलं. तर 2025 ची सुरुवातही त्याने एका खास गोष्टीने केली आहे. वरुण धवनने नववर्षाच्या सुरुवातीलाच मुंबईत आलिशान फ्लॅट खरेदी केला आहे. वरुण धवन आणि त्याची पत्नी नताशा दलालने मुंबईतील जुहू येथे 2025 च्या सुरुवातीलाच नवीन घर खरेदी केलं आहे. 'द' डेकोर ट्रेन्टी'मधील हा फ्लॅट सुमारे 5 हजार स्क्वेफूट परिसरात पसरला आहे. मुंबईतील प्राइम लोकेशनमध्ये असलेल्या या फ्लॅटसाठी वरुण धवनने 2.67 कोटींची स्टॅम्प ड्युटी भरली आहे. तर या घराची किंमत तब्बल 44.52 कोटी इतकी आहे. मीडिया रिपोर्टनुसार, 3 जानेवारीला ही प्रॉपर्टी त्यांनी खरेदी केली आहे.

दरम्यान, वरुण धवनने 2021 मध्ये बालपणीची मैत्रीण नताशा दलाल हित्याशी लग्न करत संसार थाटला. गेल्या वर्षीच वरुण धवन बाबा झाला. जून महिन्यात नताशाने गोंडस लेकीला जन्म दिला. लारा असं त्यांनी मुलीचं नाव ठेवलं आहे. बेबी जॉननंतर वरुण धवन 'बॉर्डर 2'मध्ये दिसणार आहेत.

# या आठवड्यात ओटीटीवर वर रिलीज होणारे वेबसिरीज!



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात प्रेक्षकांना अनेक चित्रपट व सीरिज ओटीटीवर पाहता येणार आहेत. या आठवड्यात हॉलीवूड, बॉलीवूड आणि अनेक उत्तम वेब सीरिज प्रदर्शित होणार आहेत, ज्या तुम्ही घरबसल्या सहज पाहू शकता. या आठवड्यात कोणते चित्रपट आणि सीरिज डिजिटल प्लेटफॉर्मवर येणार, त्याची यादी जाणून घेऊयात.

शार्क टँक इंडिया 4 : तीन सीझन यशस्वी झाल्यानंतर आता शार्क टँक इंडियाचा चौथा सीझन 6 जानेवारीपासून सुरु झाला आहे. यात प्रेक्षकांना अमन गुप्ता आणि अनुपम मित्तल यांच्यासोबत 'शार्क' पॅनलमध्ये अनेक नवीन शार्क दिसतील. प्रेक्षकांना हा शो सोनी लिव्ह या डिजिटल प्लॅटफॉर्मवर रात्री 8 वाजता पाहता येईल. ब्लॅक वॉरंट : 'ब्लॅक वॉरंट' ही एक नवीन सीरिज आहे. या सीरिजचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या सीरिजमध्ये जहान कपूर दिसणार आहे. तसेच राहुल भट्ट, परमवीर सिंग चीमा, अनुराग ठाकूर, सिद्धांत गुप्ता आणि राजश्री देशपांडे असे कलाकार यात आहेत.

विक्रमादित्य मोटवानी दिग्दर्शित ही सीरिज 10 जानेवारीपासून प्रेक्षकांना नेटफ्लिक्सवर पाहता येईल. द साबरमती रिपोर्ट : विक्रांत मॅसी स्टारर चित्रपट 'द साबरमती रिपोर्ट' गेल्या वर्षी 15 नोव्हेंबरला थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात गोध्रा घटनेची कथा दाखवण्यात आली आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कमाल दाखवू शकला नाही. आता हा चित्रपट 10 जानेवारी रोजी झी5 वर ओटीटीवर रिलीज होणार आहे. गूजबंप्स: द व्हॅनिशिंग : डेव्हिड श्विमरची ही हॉरर सीरिज त्याच्या दुसऱ्या भागासह परत येणार आहे. ही अँथनी ब्रुअरवर आधारित आहे, जे वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक आहेत. ही सीरिज 10 जानेवारी रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म हॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे.अँड विटम : गिलौम कॅनेट, स्टीफन कॅलार्ड आणि नासिम लायस यांच्या भूमिका असलेला हा थ्रिलर शो तुम्हाला घरबसल्या पाहता येईल. हा शो 10 जानेवारीपासून लोकांना नेटफ्लिक्सवर पाहता येईल.

# 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला रामराम केल्यानंतर तेजश्री प्रधानची पहिली पोस्ट!




मराठी मालिकाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री तेजश्री प्रधानने नुकताट मोठा निर्णय घेतला. सध्या टीआरपीच्या शर्यतीत अव्वल स्थानावर असलेली मालिका 'प्रेमाची गोष्ट'मधून बाहेर पडण्याचा निर्णय तेजश्रीने घेतला आहे. त्यामुळे तेजश्रीच्या चाहत्यांसह मालिकेच्या प्रेक्षकांना धक्का बसला आहे. सर्वजण नाराजी व्यक्त करत आहे. अशातच तिने 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला रामराम केल्यानंतर सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. तेजश्रीची ही पोस्ट सध्या खूप व्हायरल झाली आहे.

अभिनेत्री तेजश्री प्रधानने 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत मुक्ताची भूमिका साकारली होती. तिची ही भूमिका चांगलीच गाजली. जान्हवी, शुभ्राप्रमाणे तेजश्रीने साकारलेली मुक्ता भूमिका घराघरात पोहोचली. पण, आता 'प्रेमाची गोष्ट' मालिकेतील मुक्ताच्या भूमिकेत तेजश्री दिसणार नाहीये. तिच्या जागी मराठीसह हिंदी मालिकाविश्वात झळकलेली अभिनेत्री स्वरदा ठिगळे पाहायला मिळणार आहे. नुकतीच तेजश्रीने एक पोस्ट शेअर केली आहे.

तेजश्रीने पिवळ्या रंगाच्या साडीमधील एक फोटो शेअर करत लिहिलं की, चिअर्स...काही वेळेला बाहेर पडणं गरजेचं असतं. तुमची कुवत जाणून घ्या आणि तुमच्या अस्तित्वाचा आदर करा. कारण हे तुमच्यासाठी कोणीही करणार नाही.'प्रेमाची गोष्ट' मालिकेत मुक्ता म्हणून लवकरच पाहायला मिळणाऱ्या स्वरदा ठिगळेने 2013 साली 'माझे मन तुझे झाले' या मालिकेतून अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवलं होतं. यानंतर ती हिंदी मालिकेत झळकली. तिने 'सावित्री देवी कॉलेज'

# अभिनेता शिवराज नाळे अडकला विवाहबंधनात !



'कॉन्स्टेबल मंजू' ही मालिका 'सन मराठी' वाहिनीवर 18 मार्च 2024 पासून प्रदर्शित होऊ लागली. यामध्ये वैभव कदम आणि मोनिका राठी यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. याशिवाय या मालिकेत अभिनेता शिवराज नाळे 'जयदीप सुर्वे' ही भूमिका साकारत आहे. गेल्या काही दिवसांपासून शिवराज सोशल मीडियावर एका खास कारणामुळे चर्चेत होता. अभिनेत्याने काही दिवसांपूर्वीच आपल्या लग्नाची तारीख जाहीर केली होती. पत्नीसह प्री-वेडिंग शूटचे फोटो शेअर करत शिवराजने नव्या वर्षात 7 जानेवारीला लग्नबंधनात अडकणार असल्याचं जाहीर केलं होतं. आता अभिनेत्याचे लग्नसोहळ्याचे फोटो समोर आले आहेत.

मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून अनेक मराठी कलाकारांनी लग्नगाठ बांधत आपल्या नव्या आयुष्याची सुरुवात केली. आता यामध्ये अभिनेता शिवराज नाळेचं नाव जोडलं गेलं आहे. अभिनेत्याचा विवाहसोहळा जवळचे मित्रमंडळी व कुटुंबीयांच्या उपस्थितीत थाटामाटात पार पडला आहे. शिवराज नाळेच्या मित्रमंडळींनी त्याच्या लग्नसोहळ्यातील फोटो आणि व्हिडीओ आता सोशल मीडियावर शेअर केले आहेत. यामध्ये अभिनेत्याने लग्नमंडपात घोड्यावरुन एन्ट्री घेतल्याचं सुद्धा पाहायला मिळत आहे.

# अपघाताला निमंत्रण देणाऱ्या बस व ट्रॅव्हल्सवर कारवाई करण्याची मागणी



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड वाहतूक पोलीस आणि आरटीओ यांच्या वतीने शहरात काही बस थांबे निश्चित केले असताना काही बस चालक व ट्रॅव्हल्स चालक आपली वाहने कोठेही थांबवतात व ही वाहने अपघाताला निमंत्रण देतात, त्यामुळे अशा वाहनांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी वाहतूक सेनेचे शहराध्यक्ष विनोद वरखडे यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी पिंपरी चिंचवड व पोलीस उपआयुक्त वाहतूक विभाग यांच्याकडे केली आहे. त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, पिंपरी चिंचवड शहरातील निगडी, तळवडे, चिखली, भोसरी परिसरातून अनेक ट्रॅव्हल्स प्रवासी वाहतूक करत असतात, ते करत असताना ठरवून दिलेल्या बस थांब्यावर ही पाहणे थांबत नाही. ही वाहने शहरात कोठेही थांबतात, त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होतो. तसेच त्यामुळे अनेक अपघाती होतात, काही महिन्यापूर्वीच वाहतूक विभागाने बस व ट्रॅव्हल स्पीकर आणि ड्रॉप निश्चित केले आहे होते. तरी ट्रॅव्हल्स व बस चालक प्रवासी घेण्यासाठी रस्त्यात कोठेही बस थांबवत असतात त्यामुळे अपघातात वाढ होत आहे. त्यामुळे या वाहनांवर त्वरित कारवाई करावी ,अशी मागणी विनोद वरखडे यांनी आपल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# वारस नियुक्तीचा मार्ग अखेर मोकळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदांतील आरोग्य संवर्गामधील सर्व जाती-प्रवर्गातील आरोग्य कर्मचाऱ्यांचा लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारस नियुक्तीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

राज्य सरकारने दिनांक 24 फेब्रुवारी, 2024 रोजी काढलेल्या शासन निर्णयास मा. उच्च न्यायालय, मुंबईचे औरंगाबाद खंडपीठामध्ये स्थगिती मिळाल्यामुळे लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारस नियुक्तीबाबतची प्रकरणे गेली अनेक वर्षांपासुन प्रलंबित होते. सदर प्रकरणाबाबत राज्य सरकारने सकारत्मक निर्णय घेतलेला असताना देखील स्थगिती आदेशामुळे सदरची प्रकरणे प्रलंबित होती.

मा. उच्च न्यायालय, मुंबईच्या औरंगाबाद खंडपीठामार्फत सदर प्रकरणांवरील स्थगिती उठविण्यात आली असुन दिनांक 24 फेब्रुवारी, 2024 चा शासन निर्णय पुर्वीप्रमाणेच सर्व कर्मचाऱ्यांना लागु झाल्यामुळे महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदांमधील सर्व जाती-संवर्गातील आरोग्य कर्मचाऱ्यांचा वारस नेमणुकीचा प्रश्न मार्गी लागलेला असुन सदर कामामध्ये महाराष्ट्र राज्य महानगरपालिका-नगरपालिका-नगरपरिषद, कामगार-कर्मचारी संघटना फेडरेशन व अनेक कर्मचाऱ्यांच्यावतीने देखील अनेक वकील सदरच्या प्रकरणामध्ये देण्यात आले होते. वारस नेमणुकीपासुन वंचित राहिलेले अनेक कर्मचारी व त्यांचे वारस आज औरंगाबाद येथे उपस्थित होते.

सदर प्रसंगी महाराष्ट्र राज्य महानगरपालिका-नगरपालिका-नगरपरिषद, कामगार-कर्मचारी संघटना फेडरेशनच्या वतीने अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजुर्डे, कार्याध्यक्ष अशोक जाधव, प्रमुख सरचिटणीस गणेश शिंगे, प्रवक्ता गौतम खरात, ऍड. सुरेश ठाकुर, संतोष पवार, अंकुश गायकवाड श्रीमती. चारुशिला जोशी, नितीन समगीर, सनी कदम आदी उपस्थित होते.

# होर्डिंग तातडीने हटवावे - आयुक्त शेखर सिंह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड : महापालिका क्षेत्रातील अनधिकृत फ्लेक्स, जाहिराती, घोषणा फलक, पोस्टर्स, किऑक्स, गॅन्ट्री आदी साहित्य तातडीने हटवावे, अन्यथा संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील अनधिकृत फ्लेक्स, जाहिराती- घोषणा फलक, पोस्टर्स, किऑक्स, गॅन्ट्री आदी विरुद्ध योग्य कार्यवाही करण्याबाबत पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यातील मालमत्तेच्या विद्रुपीकरणास प्रतिबंध करण्यासाठी अधिनियम 1995 चे कलम 3 तसेच महाराष्ट्र अधिनियमातील कलम 244 (1) (2) (3), 245(1) (2) आणि महानगरपालिका आकाशचिन्ह तसेच जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण करणारे नियम दिनांक 9 मे 2022 रोजीच्या अधिसूचनेनुसार तरतुदी निर्गमित करण्यात आल्या असून या नियमांचे उल्लंघन करून अनधिकृत फ्लेक्स, जाहिराती- घोषणा फलक, पोस्टर्स, किऑक्स गॅन्ट्री आदी उभारण्यात आले असल्यास संबधितांवर कारवाई करण्यात येणार आहे.

# अल्पवयीन मुलाकडून पिस्तूल, काडतूस जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : शस्त्र बाळगल्याप्रकरणी एका अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडून एक पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त केले. पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी, औद्योगिक तक्रार निवारण विभागाने सोमवारी (दि. 6) सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास मोशी येथील संतनगरमध्ये ही कारवाई केली.संतनगर, मोशी येथे एक अल्पवयीन मुलगा पिस्तूल घेऊन आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी मुलाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक देशी पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त केले. त्याने हे पिस्तूल दीपक वाघमारे याच्याकडून आणले होते. त्यामुळे दीपक वाघमारे याच्या विरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिस अंमलदार संदीप गंगावणे यांनी एमआयडीसी भोसरी पोलिस फिर्याद दिली.

# जुन्या भांडणाच्या रागातून एकाला मारहाण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

तळेगाव दाभाडे : मध्ये जुन्या भांडण्याच्या रागावरुन एकाला लाकडी दांडक्याने व लाथ्या बुक्क्यांनी मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना 7 जानेवारी 2025 रोजी तळेगाव दाभाडे येथे घडली.याप्रकरणी मयूर मते (वय 24, रा. तळेगाव दाभाडे) यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, शुभम भोसले (वय 28), अक्षय अनिल भोसले (वय 29) या आरोपींना अटक करण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयूर यांच्यासोबत शुभम आणि अक्षय याचे यापूर्वी भांडण झाले होते, या जुन्या भांडणाच्या रागातून शुभम आणि अक्षय यांनी मयूर यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करत लाकडी दांडक्याने व लाथ्याबुक्क्यांनी मारहाण करुन गंभीर जखमी केले. याप्रकरणी अधिक तपास तळेगाव दाभाडे पोलीस करीत आहेत.

# ज्येष्ठ महिलेचे मंगळसूत्र लंपास

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणेः विवाह समारंभासाठी निघालेल्या ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील पावणेचार लाख रुपयांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना एरंडवणे भागातील डीपी रस्त्यावर घडली. याप्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत एका ज्येष्ठ महिलेने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नांदेड सिटीत राहायला आहेत. रविवारी (5 डिसेंबर) त्यांच्या नात्यातील एकाचा डीपी रस्त्यावरील मंगल कार्यालयात विवाह होता. महिला आणि त्यांचे पती रात्री सव्वाआठच्या सुमारास डीपी रस्त्याने निघाले होते. त्या वेळी दुचाकीस्वार



चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील पावणेचार लाख रुपयांचे मंगळसूत्र चोरले. महिलेने आरडाओरडा केला. दुचाकीवरील चोरटे वेगात पसार झाले.

# थकबाकी असणाऱ्या मालमत्ता महापालिकेच्या रडारवर !

## हॉटेल, मॉल पेट्रोल पंप, चित्रपटगृहे, मंगल कार्यालये, कारखाने, रुग्णालये वर धडक कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून एक लाखाहून जास्त थकबाकी असणाऱ्या सर्व थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्तांवर जप्ती कारवाईची धडक मोहिम सुरु करण्यात आली आहे. एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता तात्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयातील प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.






त्यानुसार, करसंकलन विभागाने शुक्रवार, दिनांक 7 जानेवारीपर्यंत तब्बल 418 मालमत्ता जप्त केल्या असून, त्यांच्याकडे तब्बल 11 कोटी 37 लाख 23 हजार 198 रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे. मालमत्ता जप्ती कारवाईवेळी 1511 मालमत्तांनी आपल्या थकीत कराचा भरणा करुन, 26 कोटी 92 लाख 73 हजार 749 इतक्या कराचा भरणा केलेला आहे.

थकबाकीदारांना वारंवार आवाहन करुन देखील कराचा भरणा केला नसेल अशा मालमत्तांवर जप्तीच्या कारवाईसाठी कठोर पाऊले उचलावीत असेही आदेश करसंकलन मुख्य कार्यालयाकडून विभागीय कार्यालयास देण्यात आले आहेत. शहरातील एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्यांमध्ये खासगी संस्था, खासगी महाविद्यालये व शाळा, हॉटेल, खासगी रुग्णालये, पेट्रोल पंप, औद्योगिक कारखाने, शोरुम, मंगल कार्यालय, बँक, मॉल, चित्रपटगृहे आदी आस्थापनांचा समावेश आहे.

सदर थकबाकी असणाऱ्या आस्थापनांची यादी करसंकलन विभागाकडून तयार करण्यात आली असून, संबंधित विभागीय कार्यालयास कारवाईसाठी पाठविण्यात आली आहे. याचबरोबर अशा मालमत्तांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिध्द केली जाणार आहे. त्याचबरोबर अशा थकबाकीदारांना आवाहन करण्यासाठी सदर आस्थापनांच्या बाहेर बँड पथकाकडून बँड वाजविण्यात येणार आहे. याबरोबर सदर मालमत्तांवर चालू स्थितीमध्ये सुध्दा जप्ती करण्याचे आदेश करसंकलन विभागाकडून देण्यात आले असून शहरामध्ये मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.

शहरातील थकबाकीदारांना वारंवार कर भरण्याचे आवाहन करण्यात आले असून एक लाखाहून जास्त रक्कम थकीत असणाऱ्या मालमत्तांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. शहरातील बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्ता प्राधान्याने जप्त करण्यात येत असून मालमत्ताधारकांनी आपल्या थकीत कराचा तात्काळ भरणा करुन जप्तीची कारवाई टाळावी.

- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-चिंचवड शहरातील मोठमोठी हॉटेल, मॉल, पेट्रोल पंप चित्रपटगृहे, मंगल कार्यालये, औद्योगिक कारखाने, खासगी रुग्णालये,आदी. आस्थापनांची एक लाखापेक्षा जास्त थकबाकी असल्यास अशा मालमत्ता जप्त करण्याच्या सूचना संबंधित विभागीय कार्यालयांना दिल्या असून शहरामध्ये मालमत्ता जप्तीची कारवाई मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहे. सदर आस्थापनांनी आपला मालमत्ता कर भरल्याची खात्री करावी. वरील आस्थापना चालू स्थिती मध्ये अथवा बंद झाल्यास महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

- अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी - चिंचवड महानगरपालिका

# दापोडीत एकाला मारहाण ; दोघांना अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

दापोडी : "तू आमच्या गाडीला ठेस का मारली? आणि आम्हाला शिवीगाळ का केली?," असे म्हणत पाच जणांनी मिळून एकाला बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार 6 जानेवारी 2025 रोजी दापोडी या भागात घडला.

याप्रकरणी प्रवीण बंगे (वय 35, रा. पिंपळे सौदागर) यांनी फिर्याद दिली असून, योगेश पोफळकर (वय 18) व सनी लांडे (वय 30) या दोघांना अटक करण्यात आली आहे. तर ओंकार लांडगे (वय 23), श्रेयश लांडगे (वय 24), गौरव काशीद (वय 23) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या वाहनांसमोर आरोपींनी त्यांची दुचाकी आडवी केली. त्यानंतर फिर्यादी यांना अर्वोच्च भाषेत शिवीगाळ करत, 'आम्हाला शिवीगाळ करत आहेस का?' असे म्हणत वाद घालून फिर्यादी यांना शिवीगाळ करुन बेदम मारहाण केली. या घटनेत फिर्यादी गंभीर जखमी झाले आहे. याप्रकरणी पुढील तपास दापोडी पोलीस करीत आहेत.

# अवैधरित्या गुळमिश्रीत कच्चे रसायन विकल्याप्रकरणी गुन्हा दाखल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शिरगाव : येथे एका महिलेने हातभट्टी दारु तयार करण्यासाठी लागणारे गुळमिश्रित कच्चे रसायन विकल्याप्रकरणी तिच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना 7 जानेवारी 2025 रोजी शिरगावच्याहद्दीत मावळ येथे घडली. याप्रकरणी गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार भगवंता मुठे यांनी फिर्याद दिली असून, एका महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिला आरोपी ही दारु तयार करण्यासाठी लागणारे गुळ मिश्रित कच्चे रसायनाची विक्री करत होती, तिच्याकडून एकूण 5 हजार लिटर क्षमतेचे 1 लाख 75 हजार रुपयांचे मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. याबाबत अधिक तपास परंदवाडी पोलीस करीत आहेत.

# उद्योगनगरीत वर्षभरात 15909 गुन्ह्यांची नोंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत 23 पोलिस ठाण्यांच्या हद्दीत गेल्या वर्षभरात खून, दरोडे, चोऱ्या, लुटमार, फसवणूक, वाहन चोरी, बलात्कार, विनयभंग अशा तब्बल 15 हजार 909 गुन्ह्यांची नोंद झाली. गेल्या पाच वर्षांत तब्बल 5 हजार 76 ने गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांत पोलिसांनी राबवलेल्या विविध उपाययोजनांमुळे आयुक्तालय हद्दीतील गुन्ह्यांमध्ये तब्बल 568 ने घट झाली आहे.




पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अपर पोलिस आयुक्त वसंत परदेशी, पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे, विवेक पाटील यावेळी उपस्थित होते. स्वतंत्र पोलिस आयुक्तालय झाले, असले तरी मनुष्यबळ मात्र अपुरेच आहे. 2020 या वर्षात जानेवारी ते डिसेंबर या वर्षभराच्या कालावधीत खून, दरोडे, चोऱ्या, लुटमार, फसवणूक, वाहन चोरी, बलात्कार, विनयभंग, कौटुंबिक हिंसाचार अशा विविध तब्बल 10 हजार 833 गुन्ह्यांची नोंद झाली. 2023 मध्ये वर्षभरात गुन्ह्यांची संख्या 16 हजार 477 एवढी होती. म्हणजेच 2020 च्या तुलनेत 2023 मध्ये 5 हजार 644 ने गुन्ह्यांची संख्या वाढल्याचे आकडेवारीवरुन दिसून येते. पोलिस आयुक्त म्हणून विनय कुमार चौबे यांनी 14 डिसेंबर 2022 रोजी पदभार स्वीकारला. त्यानंतर त्यांनी गुन्हेगारांना दणका देण्यास सुरुवात केली. मोक्कांतर्गत 99 टोळ्यांमधील 600 गुंडांना अटक केली. 411 अग्निशस्त्रे व 1633 धारदार शस्त्रे जप्त केली. 555 गुन्हेगारांना तडीपार करुन 47 संशयितांवर स्थानबद्धतेची कारवाई केली. वाहनचोरी रोखण्यासाठी गस्त वाढवली.



ADMISSION OPEN

# KILBIL HIGH SCHOOL & Jr. college



His Excellency Dr. A. P. J. Abdul Kalam, President of India, oppreciating studies and science project of our student, Shagufta Soudager, Std VIII on 17th January 2007.







**MR. RAFIQUE IMAM SOUDAGAR**

(FOUNDER PRINCIPAL, KILBIL SOCIETY'S SCHOOL)

**MR. NASIR IMAM SOUDAGAR &**

(ALL BOARD OF MANAGING COMMITTEE, TRUSTEE'S & STAFF)



- BRANCHES -

JANWADI | PIMPLE GURAV
KONDHWA
WADU-PERNE | DHAYARI

Contact : Mr. Shaikh J. C. : 9890428331 | Mr. Sable S. D. : 9970612980

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत हे बातमी पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक शबनम रफीक सय्यद यांनी क्रांती मुद्रणालय, सर्वे नंबर १६/६८ विठ्ठल मंदिर जवळ,गुजर नगर,थेरगाव,पुणे- ३३ येथे छापून सर्वे नंबर ११/२,पडवळ नगर,थेरगाव,चिंचवड,पुणे -३३ येथून प्रकाशित केले आहे सदर बातमी पत्रातील मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही (न्याय कक्षा पुणे न्यायालय)
अधिक माहितीसाठी : ८९९९९४८९६८ कार्यकारी संपादक :सय्यद रफिक हुसेन, • RNI - MAHMAR/2021/51259 • Email : metrocity924@gmail.com www.metrocityvrutant.in